**नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.**

**दिनांक ०९/०२/२०२५ (रविवार)**

---

## पोल्ट्री फार्म वर सुरू असलेल्या जुगार अड्डयावर धाड, एकुण २७ आरोपी ताब्यात , नगदी २,९९,१९०/—रू तसेच १ दुचाकी व ११ चारचाकी वाहनासह एकुण ५९,१६,१९०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त, नागपुर ग्रामीण पोलीसांची धडाकेबाज कारवाई

दिनांक ०९.०२.२०२५ रोजी श्री अनिल म्हस्के ,उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग तथा सहायक पोलीस अधिक्षक यांना गोपनिय बातमीदाराने माहीती दिली आहे कि, पोस्ट देवलापार हद्दीमध्ये मुकनापुर गावाकडे जााणाऱ्या रोडवरील गणेश शरणागते यांच्या शेतातील पोल्ट्री फार्म शेडमध्ये काही इसम ५२ तासपत्त्यांवर पैसे लावुन हारजीत चा जुगार खेळत आहे. श्री अनिल म्हस्के यांनी तात्काळ सदरची माहीती नागपुर ग्रामीण जिल्हयाचे पोलीस अधिक्षक मा. श्री हर्ष पोद्दार (भा.पो.से) यांना दिल्याने त्यांनी तात्काळ कारवाईचे आदेश दिले. त्यानुसार श्री अनिल म्हस्के यांनी सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर, खापा, केळवद येथील पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे वशेष पथक तयार केले. व सदर पथकासह घटनास्थळी रवाना झाले असता गणेश शरणागते यांच्या शेतातील पोल्ट्री फार्म शेडमध्ये लाईट च्या उजेडात बरेच इसम दिसले त्यापैकी काही पोल्ट्री फार्म शेड च्या बाहेर टेहाळणीकरीता उभे होते. त्यापैकी एकाला पोलीसांबाबत संशय आल्याने त्याने आरडा ओरडा केल्याने काही इसम पळुन गेले तरी सुध्दा पोलीसांनी शिताफिने २७ जुगारी इसमांना जागीच पकडले.यातील आरोपी नामे—**१) अर्जुन गणेशराम मेश्राम ,वय ३५ वर्ष रा पंप हाउस वार्ड क्र २ भाटेरा चौकी बालाघाट याला ताब्यात घेवुन पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता त्याचे अंगझडतीमध्ये ८४००/—रू रोख व एक विवो कंपनीचा मोबाईल मोबाईल मिळुन आला. आरोपी क्र २) नामे— दिपक मंजु सनोडीया, वय २६ वर्ष रा. गोरावाडी वार्ड,चौराई ,जि छिंदवाडा मध्यप्रदेश यांचे ताब्यातुन कि १०,२००/—रू रोख, एक विवो कंपनीचा मोबाईल फोन मिळुन आला. आरोपी क्र ३) नामे— ओमप्रकाश मथुराप्रकाश शर्मा,वय ५२ वर्ष, रा शिवमंदीर जवळ,वार्ड क्र १४ परासिया ,छिंदवाडा,म.प्र यांचे जवळुन रोख ९३००/—रू आणि एक रेड मी कंपनीचा मोबाईल मिळुन आले. आरोपी क्र ४) नामे विनोदकुमार श्यामलाल सोनकेसरिया, वय ४२ वर्ष रा. रा वार्ड क्र २४ ,बेहरोगंज सिवनी यांचे ताब्यातुन ८५००/—रू व एक विवो कंपनीचा मोबाईल मिळुन आला. आरोपी क्र ५) नामे— माधव सदुलाल डेकाटे वय ४५ वर्ष रा भैरवगंज, सिवनी ,म.प्र. यांचे ताब्यातुन १२,१००/—रू आणि एक विवो कंपनीचा मोबाईल मिळुन आला. आरोपी क्र ६) नामे— योगेश नेमसिंग रघुवंशी,वय ५० वर्ष, रा. वार्ड क्र १२, परासिया,छिंदवाडा,म.प्र यांचे ताब्यातुन रोख ७३००/—रू तसेच एक सॅमसंग कंपनीचा**

मोबाईल आरोपी क्र ७) नामे— प्रभु शंकरलाल मडावी, वय २४ वर्ष रा. वार्ड क्र १ वडांबा,देवलापार यांचे ताब्यातुन ४३५०/—रू मिळुन आले , आरोपी क्र ८) नामे— प्रमोद रामदास भुरे , वय २९ वर्ष रा. ताळेश्वर वार्ड क्र १ पवनी जि भंडारा यांचे ताब्यातुन ९०२०/—व एक विवो कंपनीचा मोबाईल ९) अंकीत अण्णाजी तिघरे, वय २२ वर्ष, रा. सुभाष वार्ड,खैरी दिवान,ता पवनी जि भंडारा यांचे ताब्यातुन ५०४०/—रोख व एक विवो कंपनीचा मोबाईल फोन आरोपी क्र १०) नामे— खुशदीप मनोहर वंजारी, वय २१ वर्ष, रा भेंडाळा, तह. पवनी जि भंडारा यांचे ताब्यातुन ७८००/—रू आणि एक विवो कपंनीचा मोबाईल फोन, आरोपी क्र ११) नामे— विरेंद्र अवधेश श्रीवास्तव, वय ५२ वर्ष, रा. शास्त्री वार्ड क्र ४ सिवनी म.प्र यांचे ताब्यातुन ४२००/—रू रोख व एक रेडमी कंपनीचा मोबाईल, आरोपी क्र १२) सतिष शरद उईके, ,वय २२ वर्ष, रा वडांबा,देवलापार , यांचे ताब्यातुन ५७००/—व एक विवो कंपनीचा मोबाईल फोन, १३) नामे— विशाल जमुनाप्रसाद पांडे , वय ३२ वर्ष, रा. वडांबा,ता रामटेक यांचे ताब्यातुन ४१००/—रू व एक विवो कंपनीचा मोबाईल फोन मिळुन आले , आरोपी क्र १४) नामे— सद्दाम कुरेशी मतीन कुरेशी,वय ३२ वर्ष रा. वार्ड क्र १४ वारासिवनी जि. बालाघाट म.प्र यांचे ताब्यातुन ५१००/—व एक रेडमी कंपनीचा मोबाईल १५) शशी ओमप्रकाशसिंग राजपुत वय ३४ वर्ष रा. पी.जी. कॉलेज चे समोर भैरव गंज सिवनी ता. सिवनी जि. सिवनी म.प्र.यांचे ताब्यातुन ६२७० /—रोख व एक विवो कंपनीचा मोबाईल फोन आरोपी क्र १६) नामे— ओमप्रकाश तिलकसिंग नागपुरे , वय ५० वर्ष रा वार्ड क्र २ बालाघाट म.प्र यांचे ताब्यातुन ७३९०/—रू आणि एक रेडमी कपंनीचा मोबाईल फोन, आरोपी क्र १७) नामे— अस्लम सलीम खॉन, वय ३८ वर्ष ,रा. वार्ड क्र १७ कुमारी मोहल्ला बालाघाट म.प्र यांचे ताब्यातुन १०५६०/—रू रोख मिळुन आली आरोपी क्र १८) मनोज तेजलाल पारधी ,वय ५५ वर्ष रा, वार्ड क्र २ भटेरा चौकी,बालाघाट म.प्र यांचे ताब्यातुन ६९१०/—व एक रिअल मी कंपनीचा मोबाईल फोन, आरोपी क्र १९) नामे— लक्ष्मण कंठेरी गायकवाड, वय ७४ वर्ष रा. वार्ड क्र २ गुरईया ता.जि छिंदवाडा म.प्र यांचे ताब्यातुन ७००/—व एक लावा कंपनीचा मोबाईल २०) जयकुमार मानकलाल सुर्यवंशी, वय ५७ वष, रा. बटका खापा ता. हर्रई जि. छिंदवाडा म.प्र.यांचे ताब्यातुन ९५०० /— व एक रिअल मी कंपनीचा मोबाईल फोन आरोपी क्र २१) नामे— मनिष काशीराम सेन , वय २५ वर्ष ,रा गाटरवाडा जि. नरसिंगपुर म.प्र. यांचे ताब्यातुन ६२००/—रू आणि एक रिअल मी कपंनीचा मोबाईल फोन, आरोपी क्र २२) नामे— नितेश आसाराम डेहरिया, वय २३ वर्ष,रा. बटका खापा ता. हर्रई जि. छिंदवाडा यांचे ताब्यातुन ८३७०/—रू रोख मिळुन आणि एक रिअल मी कपंनीचा मोबाईल फोन, आरोपी क्र २३) नुरेन्द्र टोरमल पटले वय ३० वर्ष,रा. हट्टा ता. जि. बालाघाट म.प्र., यांचे ताब्यातुन ७२००/—व एक रेडमी कंपनीचा मोबाईल फोन, २४) राहुल सोमचंद कावरे वय २३ वर्ष रा. बटका खापा. ता. हर्रई जि. छिंदवाडा यांचे ताब्यातुन ६१०० /—रोख व एक विवो कंपनीचा मोबाईल फोन आरोपी क्र २५) नामे— मोहम्मद ईमराम शेख ईदु ,य ३६ वर्ष,रा. न्युटन चिकली त्रिमुर्ती चौक वार्ड नं. ३ परासिया ता. परासिया जि. छिंदवाडा म.प्र. यांचे ताब्यातुन २०,३००/—रू आणि एक सॅमसंग कपंनीचा मोबाईल फोन, आरोपी क्र २६) नामे— योगेन्द्र जयकिसन बिसेन वय

**३२ वर्ष रा. दुल्हापुर ता. बरघाट जि. सिवनी म.प्र यांचे ताब्यातुन ८१००/—रू रोख मिळुन आणि एक इन्फीनिक्स हॉट कपंनीचा मोबाईल फोन, आरोपी क्र २७) विरेन्द्र प्रेमलाल ठाकरे वय ३२ वर्ष रा. गंगेरवा धपारा ता. बरघाट जि. सिवनी म.प्र.** यांचे ताब्यातुन ४०००/—व एक नोकीया कंपनीचा मोबाईल फोन, तसेच वरील इसमांच्या समोर ५२ तासपत्त्यांचे एकुण ५ नग व डावामध्ये मांडलेले नगदी रूपये १,००,०८०/— मिळुन आले याप्रमाणे एकुण नगदी रूपये २,९९,१९०/— मिळुन आल्याने ते पंचांसमक्ष जप्त केले.

घटनास्थळाच्या बाहेर उभ्या असलेले वाहन क्र. १) एक महिन्द्रा स्कार्पिओ चारचाकी गाडी क्र. एम एच ३१ डिके ५४०१ क्र २) एक महिन्द्रा स्कार्पिओ एन चारचाकी गाडी क्र. एमपी ०४ झेड एक्स ५४९३ क्र ३) एक मारूती स्वीफ्ट डिझायर चारचाकी गाडी क्र. एमपी २८ सीए ४५४७ क्र ४) एक हयुंडाई एक्सएन्ट चारचाकी गाडी क्र.एमएच ४७ एन १९१७ क्र ५) एक महिन्द्रा झायलो चारचाकी गाडी क्र. एमपी ०९ बीसी ३१९० ६) एक हयुंडाई आय २० चारचाकी गाडी क्र. एमपी ५० सी ६००० ७) एक मारूती सुझुकी अर्टीगा चारचाकी गाडी क्र. सीजी ०४ एचजे ९४५५ क्र ८)एक टाटा नेक्सॉन चारचाकी गाडी क्र. एमपी ५० सी ८५९१ , क्र ९) एक महिन्द्रा झायलो चारचाकी गाडी क्र. एमपी ह ५० बीसी ०८१९ क्र १०) एक टाटा झेस्ट चारचाकी गाडी क्र. एमपी ५० झेड डी ४५३८ क्र ११) एक टाटा झेस्ट चारचाकी गाडी विना नंबर प्लेटची क्र १२) एक होन्डा ॲक्टीवा कंपनीचा मोटरसायकल क्र. एमएच ४० सी एल ९७८५, तसेच एक विवो कंपनीचा काळया व लाल रंगाचा रू. १०००० किंमतीचा मोबाईल हॅन्डसेट मिळुन आला.याप्रमाणे सदर घटनास्थळी एकुण रूपये ५९,१६,१९०/— चा मुद्देमाल दोन पंचासमक्ष जप्त केला.सदरचे घटनास्थळ हे गणेश मधुकर शरणागते यांच्या मालकीचे असल्याची प्राथमीक माहीती पोलीसांना हाती लागली.

पोलीस निरीक्षक श्री विशाल गिरी पोलीस स्टेशन खापा यांचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन देवलापार येथे भारतीय न्याय संहिता कलम ११२ सहकलम म.जु.का. कलम ४ व ५ अन्वये अन्वयें गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा पुढील तपास देवलापार पोलीस करीत आहे. कलम ११२ भान्यास मधील किरकोळ संघटीत गुन्हेगारी या कलमानुसार तपास करण्याचे प्रस्तावीत आहे.



RESERVE BANK OF INDIA
₹100
₹500
₹200
₹50
₹10
CLUB
GOLD
Premium
PLAYING CARDS




HANWAT & SON'S
Xcent
MH47N1917
AK-47


Shrivastava
NEXON
XM
MP50.C.8591


MP28 CA 4547


PRESTIGE HYUNDAI
SX
MP 50 C 6000

## आरोली पोलीसांच्या सर्तक रात्रगस्ती मुळे अट्टल घराफोडी करणार गुन्हेगार ताब्यात.

**पोलीस स्टेशन अरोली**:— मा. श्री हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से.) पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या आदेशाप्रमाणे तसेच मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे परिसरात सतर्कतेने रात्र गस्त केल्या जात असते. दिनांक ०६/०२/२०२५ रोजी चे पहाटे ०४/१५ वा ते ०४/३०वा दरम्यान पोलीस अंमलदार/मनीष सुखदेवे ब.नं. १७९, चालक पोलीस अंमलदार /संग्राम चाचेरे ब नं १२७१ नेम अरोली पोलीस स्टेशन हे सरकारी वाहनाने नाईट पेट्रोलींग करीत असतांना त्यांना मौजा चौखाळा शिवारातील अरोली ते निमखेडा रोडवरील नदीच्या पुलाजवळ एक इसम जख्मी स्थीतीत लोखंडी कटर, प्लॉस्टीक चुंगडीसह संशयीतरित्या मिळुन आला. त्यास अंमलदार यांनी त्याचे नाव गाव विचारले असता, त्याने त्याचे नाव वेद संजीत राजपुत वय २४ वर्ष रा.शिक्रापुर ता.शिरुर, जि.पुणे असे सांगीतले. त्याचे डोक्याला व डाव्या पायाला मार लागुन जख्मी झाल्याचे दिसुन आले. स्टॉफने त्याचे ताब्यातील प्लॅस्टीक चुंगडीची पाहणी केली असता, त्यामध्ये मौल्यवान धातुचे आभुषणे दिसुन आले.त्यांनी तात्काळ सदर माहीती पोलीस स्टेशन अरोली चे ठाणेदार सपोनि श्री स्नेहल राउत यांना दिली.त्यांनी तात्काळ घटनास्थळी भेट दिली तेव्हा त्यांना माहीती प्राप्त झाली की सदर जखमी इसम हा सराईत घरफोडी चा आरोपी आहे. तसेच संशयीत इसम याच्या कडे घेतलेल्या माहीतीप्रमाणे त्याच्या सोबत आणखी तीन सहकारी असल्याचे समजले तसेच गुन्हात स्पोर्ट बाईकचा वापर करित असल्याची माहीती पडली.तसेच टोळीने गुन्हा करीत असल्याबाबत समजले. नमुद कारवाईत एकुण १२५८९ग्रॅम चांदीचे आभुषणे आणि ५५ग्रॅम सोन्याचे आभुषण जप्त करण्यात आले आहे.

नमुद टोळीने नागपूर, भंडारा, गोंदीया या जिल्ह्यामध्ये किंवा मध्यप्रदेश मधील क्षेत्रात गुन्हे केले असल्याची शक्यता आहे.नमुद अरोली पोलीस स्टेशन द्वारे केलेल्या कारवाईत अनेक गुन्हे उघडकीस येवु शकतात.अरोली पोलीसांच्या सतर्क कारवाई मुळे पोलीस स्टेशन आंधळगाव, जिल्हा भंडारा येथील दाखल गुन्हा उघडकीस आला आहे.

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद

पोलीस स्टेशन खापरखेडा :— दिनांक ०८/०२/२०२५ रोजी खापरखेडा पोलीस,पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गोपनिय माहीती मिळाली की अवैध रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे भानेगाव पारशिवनी टी पाइट येथे नाकाबंदी केली असता संशयीत १० चाकी ट्रक क्रं एम एच ४० सी ए ७८७३ वाहन दिसले सदर वाहनास थांबण्यासाठी इशारा केला असता पोलीसांना येताना पाहुन ट्रक चालक रोडच्या कडेला ट्रक लावुन अंधाराचा फायदा घेवुन पळुन गेला. ट्रक ची पाहणी केली असता त्यात ४ ब्रास रेती असल्याचे आढळुन आले. घटनास्थळावरून पंचासमक्ष १० चाकी ट्रक क्रं एम एच ४० सी ए ७८७३ किंमती ११,००,०००/— रूपये ,४ ब्रॉस रेती किंमत २०,०००/— रूपये **एकुण** ११,२०,०००**/— रूपयाचा** मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे..

पाहीजे आरोपी १० चाकी ट्रक क्रं एम एच ४० सी ए ७८७३ चा चालक यांच्या विरुद्ध ३०३(२),४९ भा.न्या.संहिता कलम ४८(७),४८(८) महाराष्ट जमीन महसुल अधिनियम सह कलम ४,२१ खानी आाणि नियमन अधिनियम १९५७ सह कलम ३ सार्व. संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम,सहकलम १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्याा ९ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद.

पोलीस स्टेशन नरखेड :— दिनांक **०८/०२/२५ रोजी नरखेड पोलीसांना गुप्तबातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की** केवलराम पिपळा येथे काही इसम ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळत आहे.मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचले असता आरोपी नामे **१)सागर विनायक सातपुते, २) सचिन उमाकांत डहाके, ३) राम रघुनाथ पवार ४) विष्णु रघुनाथ पवार, सर्व राह. केवलराम पिपळा,नरखेड ५) दिनेश बाबुराव मडके, रा.आग्रा, नरखेड, ६)आकाश सुधाकर चरपे रा. केवलराम पिपळा,नरखेड ,७) हर्षल मुरलीधर बल्की, रा.नांदा गोमुख नरखेड, ८) आकाश संतोषराव उइके, रा आग्रा ,नरखेड,९) मुकेश देवाजी गायधने रा केवलराम पिपळा,नरखेड** हे सर्व ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळतांना मिळुन आले.आरोपीतांच्या ताब्यातुन रोख रक्कम १६,२०० /— रूपये तसेच तास पत्ते आणि इतर साहित्य किमती

८५० /— रूपये व एकूण ८ मोटर सायकल किमती ३,८५,०००/— रूपये असा एकूण **किमती ४,०२,०५०/— रुपयाचा** मुद्देमाल जप्त करण्यात आला.

**नमुद ९ आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन नरखेड येथे १२(अ) म जु का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे**



पोलीस माहीती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर